# रेशीम कीटक संगोपनगृह

रेशीम शेड (कीटक संगोपन गृह) ही रेशीम शेतीच्या जटिल प्रक्रियेसाठी समर्पित एक विशेष सुविधा आहे. यामध्ये कच्च्या रेशीम कोष उत्पादनासाठी तुती पिकाची पाणे खाद्य स्वरूपात वापरून रेशीम किटकांचे संगोपन केले जाते. तिसऱ्या टप्प्यापासून (तिसरी मोल्ट अवस्था) ते कोष तयार होईपर्यंत - संगोपन गृह रेशीम किटकांसाठी घर म्हणून काम करते. कीटक संगोपन ग्रह रेशीम उत्पादनासाठी व किटकांच्या संगोपनासाठी अनुकूल परिस्थिती ठेवून उच्च दर्जाच्या कच्च्या रेशीम उत्पादनात योगदान देते. रेशीम उद्योग हा कृषीवर आधारित कुटीर उद्योग असून ग्रामीण भागात बेरोजगार महिला, मजूर यांना गाव स्तरावरच रोजगार उपलब्ध करून देण्याची प्रचंड क्षमता या उद्योगात आहे.

***महत्वाची वैशिष्टे:***

- ***शेडचे परिमाण: 72 × 28 फूट***
- ***उंची: 15 फूट***
- ***एकूण रॅक: 6***
- ***रॅक सेट 4/रॅक (रेशीम किटकांना आहार देण्यासाठी आणि हाताळण्याच्या उद्देशाने तयार केलेले)***
- ***युनिट क्षमता: 200 रोग-मुक्त अंडी (DFLs)***



